प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१४ – १५

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

प्रभात पुणे, शनिवार, दि. ४ ऑक्टोबर २०१४



राजगुरुनगर : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानाची शपथ घेतली.

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात स्वच्छ भारत अभियानास प्रारंभ

राजगुरुगर, दि. ३ (वार्ताहर) - महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत आभियानाचा प्रारंभ हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील सुमारे सहा हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अभियानाची घोषणा केली होती, त्यानुसार सर्व शिक्षकांसह विद्यार्थ्यांनी हाती झाडू घेत शालेय परिसर स्वच्छ केला.

या कार्यक्रमाचा शुभारंभ प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील यांनी स्वत: झाडू हाती घेऊन केला. त्यांच्या समवेत सर्व प्राध्यापक, प्रध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. यानंतर उपस्थितांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. देश स्वच्छ व नीटनेटका ठेवून भारतीयांची सेवा करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून स्वच्छतेसाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प सर्व विद्यार्थ्यांनी केला. स्वच्छता शपथेचे वाचन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख